**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधीर गंगाधर सोपल
सोपल बंगला, आगळगाव रोड, बार्शी, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बार्शी,
तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३.३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

रास्त भाव धान्य दुकानांच्या फोडाफोडीसंदर्भातील संपूर्ण कागदपत्रे मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.सुधीर गंगाधर सोपल यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांच्याकडे केली होती. 'माहितीची मागणी संदिग्ध स्वरूपातील असल्यामुळे अपीलकर्त्याशी चर्चा केल्यानंतर' १५ दिवसांत माहिती देण्याचे आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, माळशिरस, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.व्ही.एम.कुचेकर यांनी दिले. माहिती विहित मुदतीत मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुधीर गंगाधर सोपल यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर, अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर व अपीलकर्ता हे तिघेही सुनावणीला उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याचे आदेश आयोगाने दि.३.४.२०१० च्या पत्रान्वये दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी दि.१२.४.२०१० च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. उपलब्ध असलेली माहिती दि.३.३.२००८ रोजी अपीलकर्त्यास नि:शुल्क देण्यात आली आहे. नेमकी कोणत्या दुकानाची

माहिती अपेक्षित आहे याचा स्पष्ट खुलासा त्यांनी केलेला नाही, असे तहसीलदार, बार्शी श्री.रा.ग.शेळके यांनी खुलाशात म्हटले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांची मूळ मागणी मोघम स्वरूपाची आहे, हे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांचे म्हणणे रास्त आहे. तथापि त्यांच्या मूळ अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.के.दराडे यांनी कोणतेही उत्तर दिलेले नाही. 'यापुढे माहिती मुदतीत न दिल्यास जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल,' असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी निकालपत्रात म्हटले आहे. दि.१९.११.२००७ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यांच्या दि.२५.२.२००८ च्या निर्णयानंतर दि.२९.२.२००८ रोजी पाठविली असल्याचे तहसीलदार, बार्शी यांच्या दि.१२.४.२०१० च्या अहवालासोबतच्या कागदपत्रांवरून दिसून येते. म्हणजे ९६ दिवसांनी माहिती दिली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये माहिती / उत्तर देण्यास तीस दिवसांची मुदत देण्यात आली असून हा कालावधी वजा करता माहिती देण्यास ६६ दिवस इतका विलंब झालेला आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.के.दराडे हे त्याबद्दल शास्तीस पात्र ठरतात.

माहितीची मागणी नेमकेपणाने करणे आवश्यक आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.के.दराडे यांना विलंबाच्या एकूण ६६ दिवसांबद्दल (प्रतिदिनी २५० रूपये प्रमाणे) रूपये १६,५००/- शास्ती करण्यात येत आहे. श्री.बी.के.दराडे हे सेवानिवृत्त झाले असतील तर त्यांच्या जुलै २०१०, ऑगस्ट २०१० व सप्टेंबर २०१० या महिन्यांच्या अनुक्रमे ऑगस्ट २०१०, सप्टेंबर २०१० व ऑक्टोबर २०१० मध्ये मिळणाऱ्या निवृत्तीवेतनातून तीन समान हप्त्यांत ही शास्ती वसूल करून '००७०, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व त्याचा अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळासाहेब तुकाराम कोळी
मु.पो.खलाटी,ता.जत,
जि.सांगली **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक,
भूमी अभिलेख सांगली,
जि.सांगली **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.०५.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.बाळासाहेब तुकाराम कोळी<br>मु.पो.खलाटी,ता.जत, जि.सांगली<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक,<br>भूमी अभिलेख सांगली, जि.सांगली श्री.एम.एम.शिंदे<br><br>**जन माहिती अधिकारी** तालुका निरीक्षक,<br>भूमी अभिलेख जत, जि.सांगली श्री.एस.एस.जाधव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

जमिनीच्या मोजणीसाठी आवश्यक शुल्क भरल्यानंतर केलेल्या मोजणी संबंधीच्या प्रमाणित प्रती, अतिक्रमण झाले असल्याचे क्षेत्र आदि माहिती अयोग्य व विलंबाने मिळाली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बाळासाहेब तुकाराम कोळी यांनी केली.

श्री.कोळी यांचा दि.११.१२.२००८ रोजीचा अर्ज नगरभूमापन शिरस्तेदार श्री.एम.वाय.साळे यांनी स्वीकारला, त्यांनी तो दि.०२.०२.२००९ रोजी कार्यालयाला सादर केला. माहितीच्या अधिकारातील अर्ज कार्यालयात सादर करण्यास लावलेल्या विलंबाबद्दल त्याच दिवशी त्यांना ज्ञापन देण्यात आले होते. दि.०२.०२.२००९ रोजी प्राप्त झालेल्या अर्जाला दि.०४.०२.२००९ रोजी उत्तर दिले. परंतु त्याने श्री.कोळी यांचे समाधान झाले नाही. म्हणून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख सांगली, जि.सांगली यांच्याकडे अपील केले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख जत, जि.सांगली श्री.एस.एस.जाधव यांनी केले.

मोजणीतील त्रुटी, अतिक्रमण आदिबाबतच्या तक्रारी श्री.कोळी यांनी उपस्थित केल्या असल्यामुळे त्यांच्या समक्ष नकाशा तपासला व त्यांच्या शंकांचे समाधान केले. त्यामुळे अपील निकाली काढले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख सांगली, जि.सांगली श्री.एम.एम.शिंदे यांनी केले.

जमिनीची मोजणी विहित वेळेत व योग्य प्रकारे झाली नसल्याची अपीलकर्त्यांची तक्रार असल्याचे उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे यावरुन स्पष्ट होते. या स्वरुपाची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही. आवश्यक तर संबंधित खात्यातील वरिष्ठ पातळीवर दाद मागण्याचा मार्ग अपीलकर्त्यास उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.मेघराज मडेप्पा काडादी
अध्यक्ष, श्री सिध्देश्वर देवस्थान सोलापूर, श्री सिध्देश्वर मंदिर,
श्री सिध्देश्वर पेठ, सोलापूर
(२)श्री.आनंद शंभुलिंग हब्बू
१०९९, उत्तर कसबा, सोलापूर ... अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाथ प्राईड,
पहिला मजला, उत्तर सदर बझार, सोलापूर ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, श्री सिध्देश्वर देवस्थान, सोलापूर,
श्री सिध्देश्वर मंदिर, श्री सिध्देश्वर पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८८+१११९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (२)श्री.आनंद शंभुलिंग हब्बू
१०९९, उत्तर कसबा, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, श्री सिध्देश्वर देवस्थान, सोलापूर,
श्री सिध्देश्वर मंदिर, श्री सिध्देश्वर पेठ, सोलापूर ॲड.विश्वनाथ शिवलिंगप्पा आळंगे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१.१.२००८ (अ.क्र.९८८+१११९ ) |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.१.२००८ (अ.क्र.९८८+१११९ ) |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२.२.२००८ (अ.क्र.९८८+१११९ ) |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१३.५.२००८ (अ.क्र.९८८ )<br>दि.७.६.२००८ (अ.क्र.१११९) |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

श्री सिध्देश्वर देवस्थान संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे कारण देऊन माहिती नाकारली जात आहे. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाथ प्राईड, पहिला मजला, उत्तर सदर बझार, सोलापूर यांनी आदेश देऊनही माहिती दिली जात नाही. संस्थेला तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाकडून १५ कोटी रूपये देण्यात आले असून बांधलेली इमारत संस्थेच्या मालकीची असणार आहे. हे भरीव अर्थसहाय्य असून त्यामुळे संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत असल्याने माहिती देणे बंधनकारक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.मेघराज मडेप्पा काडादी यांचे प्रतिनिधी ॲड.विश्वनाथ शिवलिंगप्पा आळंगे यांनी केले.(अ.क्र.१११९)

संस्थेला शासनाकडून थेट अर्थसहाय्य मिळत नाही. राज्य माहिती आयोगाने यापूर्वी अपीलकर्ता विरूध्द श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट यातील दहा अपिलांमध्ये निर्णय दिला आहे. तसेच उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ (रीट पिटीशन क्र.५२९४ / २००८, दि.२८.४.२००९) या प्रकरणी दिलेल्या निर्णयाप्रमाणे आपल्या विश्वस्त संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू

नसून त्याबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येत आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी, अपील क्र.९८८ व अपील क्र.१११९ मधील अपीलकर्ता श्री.मेघराज मडेप्पा काडादी, अध्यक्ष, श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट, सोलापूर यांचे प्रतिनिधी ॲड.विश्वनाथ शिवलिंगप्पा आळंगे यांनी केले.

अपीलकर्ता श्री.आनंद शंभुलिंग हब्बू व इतर विरूध्द श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट यातील अपील क्रमांक / ७०७+७१४+७१८+७५६ ते ७६०+८५८+७१३ / सोलापूर, यामध्ये आयोगाने दि.९.१०.२००९ रोजी दिलेला निर्णय उपरोक्त दोन्ही अपिलांच्या संदर्भात लागू आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
11 JUN 2010